विल्बर राइट (1867-1912)

ऑरव्हिल राइट (1871-1948)

विमानाचे निर्माता

लहानपणी *विल्बर* आणि ऑरव्हिल राइट यांना नवनव्या वस्तू, विशेषत: उडणाऱ्या वस्तू, बनवण्याचा छंद होता. *ओहायो* राज्यातील *डेटन* शहरात ते आपण बनवलेल्या वस्तू विकून पैसे कमवत असत.



मग दोघांनी मिळून एक सायकल दुकान उघडले. तेव्हा सायकल हे लोकप्रिय वाहन बनू लागले होते. दोघे सायकल बनवण्यात आणि दुरुस्त करण्यात कुशल झाले होते.

1896 साली त्यांनी आद्य ग्लायडर संशोधक *ओट्टो लिलिएंथल* यांच्या मृत्यूची खबर ऐकली. तेव्हाच त्यांनी आपले स्वत:चे उडणारे यंत्र बनवण्याचा निश्चय केला.

बरीच खटपट करून त्यांनी एक ग्लायडर बनवले आणि ते पतंगासारखे उडवले. मग त्यांनी माणसाला घेऊन उडणारे ग्लायडर बनवायचे ठरवले.

1900 आणि 1901 मध्ये, त्यांनी दोन पूर्ण आकाराच्या ग्लायडरच्या चाचण्या केल्या. पण दोन्ही अपयशी ठरल्या. दोघा भावांनी उडायचे स्वप्न सोडून देण्याचा विचार केला.

मग त्यांनी नव्याने काम सुरू केले. त्यांनी एक *विंड टनेल* बनवले. त्यात वेगवेगळ्या आकाराच्या पंखांची चाचणी केली.



त्यांच्या तिसऱ्या ग्लायडरला यश मिळाले. त्यांनी त्यातून हजारो उड्डाणे केली.
मग त्यांनी इंजिन आणि प्रोपेलर असलेले विमान बनवायला सुरुवात केली.

1903 सालाच्या अखेरीस, ते उडण्यासाठी सज्ज झाले. 17 डिसेंबर रोजी, *नॉर्थ कॅरोलिना* राज्याच्या *किट्टी हॉक* गावातील *किल डेव्हिल हिल* भागात ऑरव्हिलने आपले *फ्लायर 1* हे विमान उडवले. तो 12 सेकंद हवेत उडत राहिला. इंजिनच्या मदतीने केलेले ते जगातील पहिले उड्डाण होते.

पुढली दोन वर्षे, विल्बर आणि ऑरव्हिल यांनी आणखी दोन नवीन विमाने बनवली. ते सतत आपल्या विमानांमध्ये सुधारणा करत राहिले. 1903 साली त्यांचे *फ्लायर 3* हे विमान 30 मिनिटे हवेत उडत राहिले. ते वळूही शकत होते आणि त्याचा वेग ताशी 35 मैल होता.

1908 साली अमेरिकी युद्धखात्याशी करार करून विल्बरने आपल्या विमानांचे प्रदर्शन करण्यासाठी फ्रान्स आणि अमेरिकेचे दौरे केले. त्याने न्यूयॉर्कमध्ये *स्टॅच्यू ऑफ लिबर्टी*ला प्रदक्षिणा घातली तेव्हा खाली जमिनीवर जमलेली गर्दी अवाक् झाली. विल्बर आणि ऑरव्हिल यांनी हवेवर हुकूमत मिळवली होती.